विधानसभा / विधानपरिषद प्रश्न, प्रस्ताव, ठराव, निवेदने, सूचना इ. चे अन्य विभागांस हस्तांतरण करणे, प्रकरणे अधिनिर्णयासाठी पाठविणे, याबाबत करावयाच्या कार्यवाहीसंबंधी मार्गदर्शक सूचना.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक : काकाप १८१९ /प्र.क्र.२४ /१८ (र.व का.)
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- २० मे, २०१९

वाचा : १) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : डीडीएस - १०६३ - डी, दिनांक २४ एप्रिल, १९६३.
२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : शाकाप १०९१ /८ / १८ (र. व का.), दिनांक ११ जुलै, १९९१.
३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण १०९९ / प्र. क्र. १४ /९९ / १८, दिनांक २४ फेब्रुवारी, १९९९,
४) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : संकीर्ण १०.०६ / प्र. क्र. १३ / २००६ / १८ (र.व का.), दिनांक २८ फेब्रुवारी, २००६,
५) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : शाकाप २०१३ / प्र. क्र. २ / १८ (र.व का.), दिनांक २८ फेब्रुवारी, २०१३,
६) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक : विमंस-२०१३ / प्र. क्र. ६७ / १८ (र.व का.), दिनांक २७ जुलै, २०१५.

प्रस्तावना :-

विधानमंडळाचे प्रश्न, लक्षवेधी सूचना इ. हाताळण्याबाबत अनेक वेळा विविध विभागांमध्ये मतभेद होतात. असे प्रश्न कोणत्या विभागाने हाताळावेत, याबाबतची प्रकरणे अधिनिर्णयासाठी रचना व कार्यपद्धती कार्यासनास मोठ्या प्रमाणावर प्राप्त होतात. सदर प्रकरणांचे अवलोकन केले असता, त्यातील बहुसंख्य प्रकरणे ही कोणतीही आवश्यकता नसताना सामान्य प्रशासन विभागाच्या रचना व कार्यपद्धती कार्यासनाकडे अधिनिर्णयासाठी पाठविण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे विधानमंडळाचे प्रश्न, लक्षवेधी सूचना इ. यांचा संबंधित मंत्रालयीन विभागांच्या स्तरावरच कशा पद्धतीने निपटारा होईल, याबाबत सूचना निर्गमित करण्याची बाब या विभागाच्या विचाराधीन होती. सबब यासंदर्भातील सर्वसमावेशक सूचना खालीलप्रमाणे निर्गमित करण्यात येत आहेत.

शासन परिपत्रक :-

विधानमंडळाचे प्रश्न, लक्षवेधी सूचना इ. हाताळताना मंत्रालयीन विभागांनी पुढील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

१. विधानमंडळाचे प्रश्न, लक्षवेधी सूचना इ. विधानमंडळ सचिवालयाकडून ज्या विभागास चिन्हांकित करण्यात आलेल्या आहेत, त्या विभागांनीच हाताळावयाच्या असून केवळ अपवादात्मक परिस्थितीत प्रकरण रचना व कार्यपद्धती कार्यासनाकडे अधिनिर्णयासाठी सादर करणे अपेक्षित आहे.

२. अधिनिर्णयासाठी / हस्तांतरणासाठी प्रस्तावित करताना संबंधित प्रकरण सचिव स्तरावरच सादर करण्यात यावे.

३. प्रश्न ज्या विभागास प्राप्त झाला आहे, त्या विभागाने प्रथम क्षेत्रिय कार्यालयाकडून प्रश्नासंबंधी अहवाल मागवावा. तसेच प्रकरण अधिनिर्णयार्थ सादर करावयाचे असल्याचे सदर अहवाल, संबंधित नियम, शासन निर्णय यांच्या प्रती नस्तीवर उपलब्ध करून देण्यात याव्यात, अन्यथा सदर प्रकरण स्वीकृत करण्यात येणार नाही.

४. अनेक प्रश्नांच्या प्रश्नभाग-१ मध्ये विधानमंडळ सदस्यांनी शासनाकडे दिलेल्या निवेदनाचा उल्लेख असतो. तथापि सदर निवेदन विभागात उपलब्ध होत नसल्याने बरेच वेळा प्रश्नाचे उत्तर पाठविण्यास विलंब होऊ शकतो. या विभागाच्या दिनांक २७ जुलै, २०१५ च्या परिपत्रकातील परिच्छेद-५ मध्ये लोकप्रतिनिधींकडून प्राप्त निवेदनांसाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार मंत्रालयीन विभाग तसेच अधिनस्त कार्यालयांनी अशी नोंदवही ठेवावी. अशा प्रकारे स्वतंत्र नोंदवही असल्यास लोकप्रतिनिधींची निवेदने शोधणे सोयीस्कर होईल.

५. ज्या विभागास प्रश्न प्राप्त झालेला आहे, त्या विभागाकडून अधिनिर्णय मागणे अपेक्षित असून प्रश्नाचे हस्तांतरण ज्या विभागास प्रस्तावित करण्यात आलेले आहे, त्या विभागाने अधिनिर्णयाची मागणी करणे अपेक्षित नाही. त्यामुळे अधिनिर्णयाची मागणी प्रश्न प्राप्त झालेल्या विभागानेच करावी.

६. प्रश्नाचे हस्तांतरण अस्वीकृत करताना संबंधित विभागाने त्यामागील विस्तृत कारणमिमांसा, शासन निर्णयातील तरतूदी, यापूर्वी झालेला पत्रव्यवहार इ. कागदपत्रांसह विशद करणे आवश्यक आहे.

७. विधानमंडळ प्रश्नाचे उत्तर पाठविण्यासाठी असलेली कालमर्यादा विचारात घेता सदर बाबीस सर्वोच्च प्राथम्य देऊन हस्तांतरण स्वीकृतीबाबत संबंधित विभागाने तातडीने कळविणे आवश्यक आहे.

८. **एकापेक्षा अधिक विभागांशी संबंधित प्रश्न असल्यास** त्यातील प्रश्नभाग-१ ज्या विभागाशी संबंधित आहे, त्या विभागानेच संबंधित प्रश्न हाताळणे आवश्यक असते, अशी बहुसंख्य विभागांची अशी धारणा आहे. सदर धारणा संपूर्णपणे चुकीची असून शासन कार्यनियमावलीखालील अनुदेश क्रमांक ५४ व ५४ए अनुसार असा प्रश्न /ठराव / लक्षवेधी सूचना / अल्पमुदतीची सूचना / कपात सूचना इ. कोणत्याही प्रकारचे विधीमंडळ आयुध, **विधानमंडळ सचिवालयाकडून ज्या विभागास चिन्हांकित केले असेल,** त्या विभागाने अन्य विभागांकडून आवश्यक माहिती प्राप्त करून घेऊन हाताळणे आवश्यक आहे.

९. एकाच मंत्री महोदयांच्या नियंत्रणाखालील विविध विभागांमध्ये एखाद्या प्रश्नावर मतभेद झाला तर त्या प्रश्नावर शासन कार्यनियमावलीच्या अनुदेश ८ (२) अनुसार संबंधित मंत्री महोदयांचे निदेश घेण्यात यावेत. तसेच एकाच विभागातील दोन किंवा त्यापेक्षा अधिक उपविभागांमध्ये (उ.दा. उद्योग, उर्जा व कामगार विभाग किंवा गृह, परिवहन, बंदरे इ.) जेव्हा संबंधित प्रश्न हाताळण्याबाबत मतभेद निर्माण होतात, त्यावेळी संबंधित विभागातील रचना व कार्यपद्धती कार्यासनाने सदर प्रश्न कोणत्या उपविभागाने हाताळावा, याबाबत अधिनिर्णय देणे अपेक्षित आहे. अशी प्रकरणे सामान्य प्रशासन विभागाकडे अधिनिर्णयासाठी पाठविण्यात येऊ नयेत.

१०. ज्या प्रकरणी जिल्हाधिकारी / महानगरपालिका / जिल्हापरिषदा यांचेकडून कार्यवाही करण्यात येत असेल तर संबंधित प्रश्न त्यांचे प्रशासकीय विभाग म्हणून अनुक्रमे महसूल विभाग, नगर विकास विभाग, ग्रामविकास विभाग यांनी प्रश्न हाताळावा, अशी अनेक विभागांची धारणा असते. तथापि उक्त कार्यालयांकडून मंत्रालयातील विविध विभागांच्या योजना / अधिनियम / शासन निर्णय यांची केवळ अंमलबजावणी करण्यात येत असते. त्यामुळे संबंधित योजना / अधिनियम / शासन निर्णय ज्या विभागाशी संबंधित आहे, त्या विभागानेच विधानमंडळाचा प्रश्न हाताळणे आवश्यक असते.

११. एकापेक्षा अधिक मागण्या असलेल्या विविध विभागांशी संबंधित निवेदनांबाबत किंवा मागण्यांबाबत जेव्हां प्रश्न अथवा अन्य संदर्भ विभागांकडे आल्यास ज्या विभागाशी संबंधित मुद्दे / मागण्या जास्त आहेत, त्या विभागाने अन्य विभागांकडून माहिती प्राप्त करून घेऊन संबंधित प्रश्न हाताळणे आवश्यक आहे. जर सर्वच विभागाच्या मागण्यांची संख्या समान असेल तर संदर्भ ज्या विभागास प्राप्त झाला असेल त्या विभागाने अन्य विभागांकडून माहिती मागवून तो हाताळावा.

१२. पूर किंवा अतिवृष्टीमुळे बंधारा फूटून झालेल्या शेती / शेतजमीन / जिवित किंवा घरांची हानी यासंदर्भात प्रश्न प्राप्त झाल्यास त्यावर उक्त संदर्भ-३ येथील दिनांक २४ फेब्रुवारी, १९९९ मधील सूचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.

१३. शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध नियम, २०१३ मधील नियम ११ झ अनुसार विधानमंडळविषयक बाबी या विषयसूचीनुसार कोणत्या विभागाने हाताळाव्यात यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाच्या रचना व कार्यपद्धती विभागाच्या सचिवांच्या स्तरावर अधिनिर्णय देण्यात आला तर मा. मुख्य सचिव किंवा मा.मुख्यमंत्री यांचे कोणतेही अन्य निर्देश नसतील तर तो अंतिम असतो. सदर तरतूद स्वयंस्पष्ट असल्याने अधिनिर्णयाचा फेरविचार करण्याबाबत या विभागास प्रकरण पुन्हा सादर करण्यात येऊ नये. अशा प्रकरणांवर या विभागांकडून कोणतेही अभिप्राय देण्यात येणार नाहीत.

२. तरी सर्व मंत्रालयीन विभाग व विभागांच्या सचिवांनी वरील सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. यांचे पालन न करता नस्ती सामान्य प्रशासन विभागास अधिनिर्णयासाठी पाठविण्यात आल्यास त्याची दखल घेतली जाणार नाही. याबाबत प्रश्नाचे उत्तर पाठविण्यास विलंब झाल्यास त्याची जबाबदारी संबंधित विभागांच्या सचिवांची राहिल.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संगणक संकेताक २०१९०५२३१५४८५०८३०७ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने.

Digitally signed by Medha Gadgil
Date: 2019.05.23 15:57:01 +05'30'

(मेधा गाडगीळ)
अपर मुख्य सचिव (प्र.सु.र.व का.)

प्रति,

१. मा. राज्यपालांचे सचिव (५ प्रती) (पत्राने),
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव (५ प्रती), मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
३. सर्व मंत्री / राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
४. मा.विरोधी पक्षनेता, विधान परिषद/ विधान सभा, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
५. सर्व सन्माननीय संसद सदस्य, विधानसभा व विधानपरिषद सदस्य,
६. सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई, (पत्राने),
७. मा.मुख्य सचिव यांचे वरिष्ठ स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
८. मा. महाअधिवक्ता, मा. उच्च न्यायालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई,
९. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -१, महाराष्ट्र, मुंबई,
१०. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) -२, महाराष्ट्र, नागपूर,
११. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) -१, महाराष्ट्र, मुंबई,
१२. प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा) -२, महाराष्ट्र, नागपूर,
१३. सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,मंत्रालयीन प्रशासकीय विभाग,
१४. महाप्रबंधक, मा. मुंबई उच्च न्यायालय, मुंबई,
१५. प्रबंधक, मुंबई उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई,
१६. प्रबंधक, मा. लोकायुक्त व मा. उप लोकायुक्त यांचे कार्यालय, नवीन प्रशासन भवन, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई,
१७. सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई, (पत्राने),
१८. प्रधान सचिव, विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
१९. मा.मुख्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, मुंबई,
२०. सर्व विभागीय आयुक्त,
२१. सर्व जिल्हाधिकारी,
२२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२३. सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील सर्व विभाग प्रमुख /
२४. प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२५. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
२६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई,

२७. प्रादेशिक प्रमुख / कार्यालय प्रमुख,
२८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (५ प्रती),
२९. भारतीय जनता पार्टी, महाराष्ट्र प्रदेश, सी. डी. ओ. बॅरेक नं.१, योगक्षेम समोर, वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२०
३०. इंडियन नॅशनल काँग्रेस, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस (आय) समिती, टिळक भवन,टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई-४०००२५.
३१. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी, राष्ट्रपती भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई-४०००२१.
३२. शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई-४०००२८.
३३. बहुजन समाज पार्टी,डी-१ इन्सा हटमेंट, आझाद मैदान, मुंबई-४००००१,
३४. भारतीय कम्युनिस्ट पार्टी, महाराष्ट्र कमिटी, ३१४, राजभवन, एस. व्ही. पटेल रोड, मुंबई.
३५. भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी मुंबई.
३६. सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने, मंत्रालय, मुंबई ४०००३२,
३७. निवड नस्ती (कार्यासन १८), सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.